दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Legrand HAVELLS Finolex KOLORS USHA PHILIPS SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ४ थे अंक २३५ वा बुधवार दि.१२ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## बीड जिल्ह्यासाठी आनंदाची बातमी : नवीन रेल्वेमार्ग सर्वेक्षणास निधी मंजूर धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वे मार्ग होणार, रेलबोर्डाचे चेअरमनसोबत खा.सोनवणेंनी केली ऑनलाईन पाहणी

केज/प्रतिनिधी उस्मानाबाद(धाराशिव)-बीड-औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) रेल्वे लाईन प्रकल्पाला मंजुरी देण्याची मागणी निवडून आल्यापासून खा. सोनवणे हे सातत्याने रेल्वेमंत्री व रेल बोर्डाकडे करत आहेत. या मागणीची दखल घेत रेल्वेमार्गाची तपासणी करण्याचे आदेश दि. १० फेब्रुवारी रोजी रेल्वे मंत्री यांनी संबंधित संचालकांना दिले होते. आता संबधित रेल्वे मार्गाचे सर्व्हेक्षण करण्यास मंजूरी देण्यात आली असून सर्व्हे क्षणासाठी रु. ६ कोटी निधीस मंजुरीचे आदेश देण्यात आले आहेत. रेल्वे बोर्डाचे चेअरमन सतिश कुमार यांच्या कार्यालयात खा.सोनवणे यांनी रेल्वे मार्गाची ानलाईन पाहणी केली. खा.बजरंग सोनवणे यांनी दि.१० फेब्रुवारी रोजी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांना भेट घेतली होती. यावेळी उस्मानाबाद-बीड-औरंगाबाद नवीन मार्ग प्रकल्पाचा अहवाल रेल्वे बोर्डाला सादर करण्यात आलेला असून या प्रकल्पाची एकूण लांबी २४०.१५ किमी आहे. ज्याचा अंदाजे खर्च ४८५७.४७ कोटी रुपये असल्याचे निदर्शनास आणून दिले. मराठवाडा प्रदेशात अखंड कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी, प्रवासाचा वेळ कमी करण्यासाठी आणि व्यापार आणि उद्योगासाठी नवीन मार्ग उघडण्यासाठी हा रेल्वे मार्ग महत्त्वाचा आहे, हे पटवून दिले होते. केंद्रीय रेल्वेमंत्री यांनी पत्राव्दारे या प्रकल्पास मंजुरी देण्याबाबत प्रकल्पाची व्यवहार्यता व सुविधा तपासणी करण्याचे निर्देश संबंधित संचालक यांना दिले होते. यानंतर आता केंद्र सरकारच्या रेल्वे मंत्रालयाने धाराशिव (उस्मानाबाद)-बीड-छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद) या २४० किमी नवीन रेल्वे मार्गासाठी अंतिम सर्वेक्षणास मंजुरी दिली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी ६ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हा रेल्वे मार्ग मराठवाड्याच्या दळणवळणाच्या सोयींमध्ये मोठी क्रांती घडवेल आणि विकासाला गती देणार आहेच पण बीड जिल्ह्याच्या तसेच मराठवाड्याच्या प्रगतीसाठी हा महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. हा रेल्वेमार्ग व्हावा, यासाठी खा.बजरंग सोनवणे हे जुलै २०२४ पासून (उस्मानाबाद) धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद) अशा २४० किलोमीटर नवीन रेल्वेमार्गाच्या मागणीसाठी सातत्याने रेल्वे मंत्री व रेल बोर्डाकडे पाठपुरावा करत आहेत. आज मंगळवार दि.११ मार्च रोजी रेल बोर्डाचे चेअरमन सतिषकुमार यांचे सोबत या रेलमार्गाची ानलाईन पाहणी केली. बीडला मराठवाड्यातील सर्वात मोठे जंक्शन पुर्व-पश्चिम रेल्वे मार्गाचे काम सुरू आहेच पण आता दक्षिण-



उत्तर रेल्वेमार्गाचेही सर्वेक्षण होत असून या कामाला गती मिळेल. दोन्ही रेल्वे मार्ग झाल्यास बीडमध्ये मराठवाड्यातील सर्वात मोठे जंक्शन होणार आहे. अहिल्यानगर-परळी रेल्वेमार्गाबरोबरच धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेमार्गही बीड जिल्ह्यासाठी विकासाच्या दृष्टीने मोठा फायदेशीर ठरणार आहे. रेल्वे बोर्डाचे चेअरमन सतिश कुमार यांच्या कार्यालयात रेल्वे मार्गाची ानलाईन पाहणी केली. रेल्वेमार्गाविषयी सविस्तर चर्चा केली. हा रेल्वेमार्ग लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी मी प्रयत्नशील राहील. -खा.बजरंग सोनवणे, बीड.

पाठपुरावा करावा तो खा.सोनवणेंनी: वाघ

खा.बजरंग सोनवणे यांना लोकसभा निवडणूकीत जिल्ह्यातील सुजान नागरिकांनी निवडून दिले, याचा मतदार व जिल्ह्यातील रहिवासी म्हणून अभिमान वाटत आहे. गेल्या वर्षभराच्या आतच त्यांनी बीड रेल्वेसाठी पाठपुरावा केला. आहिल्यानगर-बीड-परळी बंद असलेली कामे चालू करुन गतीने काम पूर्णत्वास जात आहे. नवीन रेल्वेमार्गासाठी देखील त्यांनी जो पाठपुरावा केला आहे, तो कमालीचा आहे. पाठपुरावा करावा तो खा.बजरंग सोनवणे यांनीच. याच पाठपुराव्याचे हे फळ आहे, अशी प्रतिक्रिया बीड येथील नागरिक शरद वाघ यांनी दिली आहे.

## मालमत्ता कर व गाळे भाडे शास्ती माफी योजनेस मुदतवाढ गाळे धारकांना ७५ टक्के सूट एमआयडीसी मधील मालमत्ता धारकांनाही सवलत

लातूर/ प्रतिनिधी: मनपाच्या वतीने मालमत्ता कर व गाळे भाडे शास्ती योजनेस मुदतवाढ देण्यात आली असून गाळेधारकांना आता ७५ टक्के सवलत दिली जात आहे. एमआयडीसी मधील मालमत्ताधारकांसाठीही ५० टक्के सवलत योजना राबविण्यात येत असून मालमत्ता धारकांनी या संधीचा लाभ घेत आपल्याकडील कर भरणा करावा, असे आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

दिनांक १७ मार्च पर्यंत ही सवलत योजना लागू राहणार आहे.या काळात थकबाकीदारांसाठी व्याज व शास्तीमध्ये ५० टक्के सवलत दिली जाणार आहे.चालू आर्थिक वर्षातील मार्च महिना सुरू झाला तरी काही मालमत्ता धारक व गाळे धारकानी अद्याप कर भरणा केला नसल्याने मनपा कर संकलन विभाग व मालमत्ता विभागाच्या वतीने धडक वसुली मोहीम राबविण्यात येत आहे.नागरिकांनी आपल्या मालमत्तेचा थकीत कर भरणा करावा यासाठी ५० टक्के शास्ती सुट लागू करण्यात आली होती. मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे धारकाकडे मोठ्या प्रमाणात गाळे भाडे प्रलंबित असल्याने त्याना व्याजात सुट देण्यात आली होती.

दोन्ही विभागाकडून शास्ती सुट लागू केल्याने बहुतांशी नागरिक व गाळे धारकानी आपल्या कडील कर,भाडे भरून योजनेचा लाभ घेतला.या योजनेस उस्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. काही मालमत्ता धारक व गाळे धारक वैयक्तिक अडचणी मुळे कर भरणा करू न शकल्याने त्यानी महापालिकेकडे योजनेस मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे . थकबाकीदारांची मागणी व मार्च महिन्यात कर भरणा करण्याकडे असणारा कल विचारात घेऊन मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी वरील दोन्ही योजनेस १७ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.



उर्वरित सर्व थकबाकीदार, मालमत्ता धारक व गाळे धारकानी १७ मार्च पर्यंत आपल्याकडील थकीत कर भरणा करून घ्यावा. त्या नंतर कोणतीही सूट लागू होणार नाही,असे कर संकलन विभागा मार्फत कळविण्यात आले आहे.

मार्च महिना सुरु झाल्याने थकीत कर व गाळे भाडे वसूलीसाठी नियुक्त पथकामार्फत जप्तीची कार्यवाही तीव्र करण्यात येत असून या अंतर्गत मालमत्ता सील करणे,अटकाव करणे,नळ कनेक्शन बंद करणे आदी कार्यवाही करण्यात येणार आहे. मालमत्ता व गाळे जप्त किंवा सील करूनही मालमत्ताधारकांनी कर भरणा न केल्यास अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेचा लिलाव,विक्री करून कर वसूल करण्यात येणार आहे.

मालमत्ताधारक व मनपा गाळे धारकानी या संधीचा फायदा घेऊन आपल्याकडील थकीत कर, गाळे भाडे भरून मनपा प्रशासनास सहकार्य करावे,असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे. एमआयडीसी मधील मालमत्ताधारकांनाही सवलत योजना लागू करण्यात आली आहे या माध्यमातून मालमत्ताधारकांनी आपल्याकडील कराचा भरणा करावा असे आवाहन बाबासाहेब मनोहरे मनपा आयुक्त तथा प्रशासक यांनी केले आहे.

## जुन्यावाहनांवर ३० एप्रिलपूर्वी एचएसआरपीनंबर प्लेट बसविण्याचे आवाहन

लातूर :- वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरीकरुन होणारे गुनहे कमी करणे, रस्तयावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व तसेच राष्ट्रीयसुरक्षेच्या दृष्टिकोनातून सर्व वाहनांना एच.एस.आर.पी. बसविणे अत्यावश्यक असून याबाबतसर्वोच्च न्यायालयाने निर्देशही दिले आहेत. या निर्देशांची अंमलबजावणी व नागरिकांच्यासुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून वाहनांना एच.एस.आर.पी. बसविण्याचे महत्व लक्षात घेवूनमहाराष्ट्र शासनाने ९ एप्रिल, २०१९ पूर्वी उत्पादित झालेल्या सर्व जुन्या नोंदणीकृतवाहनांना एच.एस.आर.पी. बसविण्याचा निर्णय घेतला आहे. लातूर जिल्ह्यातील १ एप्रिल, २०१९ पूर्वीउत्पादित झालेलया सर्व जुन्या नोंदणीकृत वाहनांना एच.एस. आर.पी. फिटमेंट सेंटर येथून एच.एस.आर.पी. नंबर प्लेट बसविण्याची कार्यवाही सुरु आहे. परिवहन विभागाच्य या संकेतस्थळाचावापर करून लातूर जिल्हयातील अधिकृत फिटमेंट सेंटरवर एच.एस.आर.पी. नंबर बसविण्यासाठीबुकींगची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. एच.एस. आर.पी. नंबर प्लेट बसविण्याची अंतिम मुदत ३० एप्रिल, २०२५रोजी पर्यंत आहे. लातूर जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांनाआवाहन करण्यात येते की, वाहनधारकांची फसवणूक टाळण्यासाठी परिवहन विभागाच्या संकेतस्थळावरीलअधिकृत लिंकचा वापर करुन एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी बुकींग करावी. एच.एस.आर.पी.बसविण्याची कार्यवाही लवकरात लवकर करावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विजयचव्हाण यांनी केले आहे.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा लेखणी बंद आंदोलनाचा इशारा

लातूर- सरकारी मीडिया मॉनिटरिंग खासगी संस्थेकडे देण्याच्या निर्णयाला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर यांनी विरोध करत लेखणीबंद आंदोलनाचा इशारा आज जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांच्यामार्फत निवेदन देऊन सरकारला दिला आहे.

महाराष्ट्र सरकारने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांवरील बातम्यांचे संकलन व विश्लेषण करण्याचे काम खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय पत्रकारितेच्या मूलभूत तत्त्वांना आणि लोकशाही मूल्यांना बाधा आणणारा असून, माध्यम स्वातंत्र्यावर गंभीर आघात करणारा आहे, असे मत या दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे.

पत्रकारितेचा मुख्य हेतू जनतेपर्यंत सत्य व वस्तुनिष्ठ माहिती पोहोचवणे हा आहे मात्र, सरकारकडून या कामासाठी खासगी संस्था नेमण्याचा निर्णय घेतल्याने बातम्यांवर अप्रत्यक्ष सेन्सॉरशिप लादली जाण्याचा धोका आहे. हा निर्णय सरकारविरोधी मतप्रवाह दडपण्याचा आणि प्रसारमाध्यमांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते.



देशाच्या लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी आणि पत्रकारितेच्या स्वतंत्र भूमिकेचे संरक्षण करण्यासाठी आम्ही महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई या निर्णयाला तीव्र विरोध करतो आहोत. सरकारने पारदर्शकता न ठेवता खासगी संस्थेला हे काम सोपवणे म्हणजे माध्यमांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रयत्न आहे. सरकार कडून लादली गेलेली ही अघोषित आणीबाणी त्वरित मागे न घेतल्यास येत्या १२ मार्च रोजी महाराष्ट्राचे संवेदशील आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते स्व. यशवंतराव चव्हाण (मा. मुख्यमंत्री) यांच्या जयंती दिवशी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई तर्फे राज्यव्यापी लेखणीबंद आंदोलन व निदर्शने करणार आहे याच अनुषंगाने लातूर येथील गांधी चौक येथे काळ्याफिती बांधून हे आंदोलन करण्यात येणार आहे. ही बाब पुरोगामी महाराष्ट्रात घडू नये, असे आम्हाला वाटते. यासाठी आमच्या मागण्यांचा गंभीर्यपूर्वक विचार करून राज्य सरकारने खाजगी संस्थेमार्फत मीडिया मॉनिटरिंग करण्याचा घेतलेला निर्णय त्वरित मागे घ्यावा, असे या निवेदनात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य उपाध्यक्ष तथा लातूर जिल्हाध्यक्ष अशोक देडे, शहराध्यक्ष महादेव डोंबे, जिल्हा संघटक सुधाकर फुले, जिल्हा उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, पत्रकार आनंद दणके, यशवंत पवार, दिनेश गिरी, सुनील कांबळे, संतोष सोनवणे, श्रीकांत चलवाड, वाल्मीक केंद्रे, नेताजी जाधव, डी, एल, वाघमारे आदींच्या स्वाक्षऱ्याचे निवेदन जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले.

## सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाच्या सांगता समारंभ व प्रमाणपत्र वितरण सोहळा मोठया उत्साहात संपन्न

चेंबूर :- प्रत्येक देशाचा कारभार हा त्याच्या सामाजिक, राजकीय प्रगतीवर टिकून असतो त्यामुळे समाजात सामाजिक मूल्यांची जाण असलेले चांगले सामाजिक कार्यकर्ते निर्माण व्हावेत या अनुषंगाने संकल्प संस्थेच्या वतीने सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते त्या सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाचा सांगता समारंभ व प्रमाणपत्र वितरण सोहळा पंत वालावलकर स्कुल नेहरू नगर कुर्ला (पू) या ठिकाणी रविवार ९ मार्च २०२५ रोजी मोठ्या उत्साहात यशस्वीरित्या संपन्न झाला.

सामाजिक क्षेत्रातील कार्य करीत असलेल्या तसेच समाज कार्य करण्याची आवड असणाऱ्यांसाठी १९ आठवड्याचे सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले होते, या प्रशिक्षणामध्ये समाजकार्य म्हणजे काय ? समाज कार्याचे महत्त्व नेतृत्वगुण, संवादकौशल्य, गटकार्य, प्रचार-प्रसिद्धी माध्यमे, समाज कार्यकर्त्याची भूमिका आणि विविध सामाजिक समस्या अशा विविध विषयांवर ४९ तज्ञ व्यक्ती कडून प्रशिक्षण देण्यात आले. तसेच चार शनिवार विविध संस्था संघटना आणि शासकीय कार्यालयामध्ये शैक्षणिक भेट आयोजित करण्यात आली होती सोबतच दोन दिवसीय निवासी शिबिर देखील घेण्यात आले होत त्यामध्ये व्यक्तिमत्व विकास व स्वपरिचय याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लोक सेवा संगम संचालिका इथेल डिसूझा, सिने नाट्य अभिनेत्री अमृता उत्तरावर, ट्रान्सजेंडर सामाजिक कार्यकर्त्या श्रीदेवी लोंढे, महाराष्ट्र विद्या विकास मंडळ कुर्लाचे सचिव सत्येंद्र जाधव, संकल्प संस्थेचे संस्थापकीय अध्यक्ष विनोद हिवाळे, कार्यक्रमाचे समन्वयक सविता हेंडवे, वनिता सावंत यांची उपस्थिती लाभली होती. सदर प्रसंगी सर्वप्रथम दीप प्रज्वलन करून आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुष्पगुच्छ अर्पण करून स्वागतगीत आणि सामूहिक उद्देशिके चे वाचन करुन कार्यक्रमास प्रारंभ झाला, वनिता सावंत यांनी उपस्थित पाहुण्यांचा अल्पपरिचय देऊन त्यांचे स्वागत केले तर समन्वयक सविता हेंडवे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना फार सरळ मोजक्या शब्दात मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील कदम आणि नेहा सावंत यांनी उत्कृष्ट प्रकारे केले. सर्व प्रशिक्षणार्थींनी या प्रशिक्षणा दरम्यान आपले अनुभव, काय शिकायला मिळाले काही अडचणी असतांना देखील प्रशिक्षण कसे यशस्वी पूर्ण केले तसेच भविष्यातल्या त्यांच्या वाटचाल कशी असेल मनोगताचा माध्यमातून सांगितले.




उपस्थित पाहुण्यांचा हस्ते सर्व प्रशिक्षणार्थींना त्यांनी १९ आठवड्यांचे सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग यशस्वीरित्या पुर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन त्यांना गौरवण्यात आले. उपस्थित मान्यवरांचा हस्ते विशेषता निवासी शिबिरा मध्ये ग्रुप ऍक्टिव्हिटीज च्या माध्यमातून स्पर्धा घेण्यात आल्या होत्या उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. स्वागत अध्यक्ष विनोद हिवाळे यांनी सामाजिक कार्यकर्ता यांचे भूमिका आणि भविष्यातले कार्य कसे असावे याबद्दल मार्गदर्शन केले. प्रमुख पाहुणे यांनी आपल्या भाषणामध्ये सर्व प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा देऊन भविष्यासाठी महत्त्वाच्या मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन निलोफर शेख यांनी केले. विशेष आभार वर्षाताई विद्या विलास, विद्या पाटेकर डॉ. संतोष कांबळे,आदेश पगारे सुजाता सावंत, स्वप्निल जाधव, सुनीता चिकणे शिवाजी नगर पोलीस स्टेशन, जनजागृती विद्यार्थी संघ,लोकमान्य तिलक सामान्य रुग्णालय सायन, महाराष्ट्र नशा बंदी मंडळ समतोल फाउंडेशन,युसुफ मेहर अली सेंटर,प्रिंटिंग आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया विशेष सहकार्य दिपा गमरे राजेंद्र कांबळे सूर्यकांत चव्हाण यांचे लाभले. सरतेशेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## संपादकीय....

### गतिमान महाराष्ट्राचा निर्धार

दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, थायलंड, इंडोनेशिया आणि जपान या आशियाई देशांनी पायाभूत सुविधांचा विस्तार करून, बुलेटच्या वेगाने आर्थिक विकास साधला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रात प्रथम सत्तेवर येताच रेल्वे, बंदरे, विमानतळ आणि रस्त्यांचे जाळे अगदी दुर्गम भागांपर्यंत विस्तारण्यासाठी महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले. त्याच्या परिणामी देशातील शेती, उद्योगधंदे व सेवा या क्षेत्रांचा गतिमान विकास होऊ लागला. मोदी यांनी २०४७ पर्यंत भारताला 'विकसित राष्ट्र' बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा २०२५-२६चा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केला आहे. हा त्यांचा सलग ११ वा अर्थसंकल्प असून, 'मेक इन महाराष्ट्र'द्वारे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण आखणार असल्याची घोषणाही त्यांनी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्या पर्वातच सुरू केलेल्या जलयुक्त शिवार अभियानाच्या दुसर्या टप्प्यासाठी अर्थसंकल्पात ४,२२८ कोटी रुपयांची भरीव तरतूद केली आहे. पाच हजारांवर गावांमध्ये सुमारे दीड लाख जलयुक्त शिवाराची कामे हाती घेण्यात आली असून, वर्षभरात ही कामे पूर्ण केली जातील. अर्थात यासाठी प्रशासकीय यंत्रणा सक्रिय करावी लागेल. नार, पार, गिरणा नदीजोड प्रकल्पासाठी साडेसात हजार कोटी रुपयांची तरतूद केल्यामुळे जायकवाडी धरणाच्या लाभ क्षेत्रातील साडेनऊ हजार हेक्टरवरील क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. शिवाय उल्हास आणि वैतरणा खोर्यातील पाणी गोदावरी खोर्यात वळवले जाणार असून, त्यामुळे मराठवाड्यातील दोन लाख ४० हजार हेक्टर जमीन भिजणार आहे. यामुळे शेती क्षेत्र भरभराटीला येऊन औद्योगिक मालाला मागणी वाढणार आहे. तसेच कृषी क्षेत्रातील एआयचाही वापर केला जाणार आहे.

मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ५४ हजार कोटींचे प्रकल्प प्रस्तावित असून, त्यासाठी खाडी पूल, किनारी मार्ग, भुयारी मार्ग बांधले जाणार आहेत. सध्या वाहतूक कोंडीमुळे मुंबईहून कुठेही जायचे असले, तरी प्रवासात प्रचंड वेळ जातो. तसेच पालघर जिल्ह्यात वाढवण बंदर विकसित केले जात असून, तेथे तिसरे विमानतळ बांधले जाणार आहे. बुलेट ट्रेनचे स्थानकही या बंदरावर असणार आहे. वाढवण बंदराचा समावेश कंटेनर हाताळणी करणार्या जगातील पहिल्या १० बंदरांमध्ये होणार असल्याने, भविष्यात 'सागरी दळणवळणातील महाशक्ती' म्हणून महाराष्ट्राचा उदय होऊ शकेल. शिर्डी, रत्नागिरी, अकोला, अमरावती, गडचिरोलीतही विमानतळासंदर्भातील कामे प्रगतिपथावर असून, अर्थसंकल्पात त्यांचाही विचार केला आहे. थोडक्यात, कृषी आणि औद्योगिक विकासासाठी ज्या ज्या सुविधा लागतात, त्या त्या निर्माण केल्या जात असून, त्यामुळे महाराष्ट्राचे रंगरूप आरपार बदलणार आहे. समृद्धी महामार्गालगत अ‍ॅग्रो-लॉजिस्टिक हब विकसित केले जाणार असून त्यात शीतगृहे, ग्रेडिंग, पॅकिंग आणि निर्यात हाताळणी केंद्राच्या प्रमुख सुविधा निर्माण केल्या जाणार आहेत. याचा लाभ प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यातील शेतकर्यांना होणार आहे. तसेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिसर्या टप्प्यांतर्गत एक हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ३,५८२ गावे, १४ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्याने प्रमुख जिल्हा मार्गांना वा राज्य अथवा राष्ट्रीय महामार्गांना जोडली जाणार आहेत. तसेच ७१ लाख रोजगारनिर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एकप्रकारे ग्रामीण भागात सुबत्ता येण्यासाठी तेथे शहरांच्या दर्जाच्या सुविधा निर्माण केल्या जात आहेत. पण अर्थसंकल्पात शेतकरी कर्जमाफीचा मात्र विचार करण्यात आलेला नाही हे विशेष!

वास्तविक मागच्या अतिरिक्त अर्थसंकल्पात शेतकर्यांना मोफत वीज उपलब्ध व्हावी, यासाठी साडेआठ लाख शेतकर्यांना सौरऊर्जा पंप उपलब्ध करून देण्याचे जाहीर झाले होते. याचा विसर पडला आहे का? आज महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ताणाखाली असून, तरीही छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकासाठी पुरेशी तरतूद करण्यात आली असून, मराठ्यांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून पानिपत येथे स्मारक उभारण्यात येणार आहे. राज्याच्या डोक्यावरील कर्ज व तूट अजूनही केंद्राने ठरवून दिलेल्या मर्यादेतच आहे. परंतु तरीदेखील लोकसभा व विधानसभा निवडणुकांपूर्वी जशी खर्चाची उधळपट्टी झाली, ती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न कसोशीने व्हायला हवा. आता आव्हान आहे ते कालबद्ध प्रकल्पपूर्तीचे. निवडणुका पार पडल्या असून, महायुती सरकारला आता प्रत्यक्ष रिझल्टस् दाखवावे लागतील. खरे तर महाराष्ट्र हे देशाचे 'ग्रोथ इंजिन' आहे आणि देशातील सर्वाधिक कर महसूल ज्या राज्यांतून गोळा होतो, त्यात महाराष्ट्राचा अग्रेसर वाटा आहे. गुंतवणुकीच्या क्षेत्रात राज्याने स्वतःचाच विक्रम मोडला आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चे दरम्यान म्हटले.

दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने १५ लाख ७० हजार कोटी रुपयांचे गुंतवणूक करार केले. या करारांमधून प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्याचे प्रमाण राज्यात ८० ते ९० टक्के आहे. राज्यात गेल्या दहा वर्षांतील सर्वाधिक एक लाख ३९ हजार कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक ही अवघ्या नऊ महिन्यांत आली आहे. येत्या पाच वर्षांत घरगुती ग्राहकांच्या वीज दरात २४ टक्क्यांपर्यंत कपात करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यापूर्वीच केली आहे. नमो शेतकरी सन्मान योजनेत वार्षिक तीन हजार रुपयांची वाढ करून ते पंधरा हजार रुपये करण्याची घोषणादेखील फडणवीस यांनी आधीच केली आहे. गेल्या वर्षी झालेल्या उत्तम पाऊसपाण्यामुळे कृषी विकास दर ८.६० टक्के एवढा असेल, असा अंदाज आहे. त्यापूर्वीच्या वर्षात कमी पावसामुळे तो केवळ ३.३ टक्के होता. परंतु उद्योग क्षेत्राचा विकास दर ६.२ टक्क्यांवरून घटून ४.९ टक्के होण्याची शक्यता आहे. गुजरातने निर्यातीबरोबरच दरडोई उत्पन्नात महाराष्ट्राला मागे टाकून पुढील स्थान मिळवले आहे. त्याचप्रमाणे दलित व आदिवासी योजनांच्या खर्चाला मोठ्या प्रमाणात कात्री लावण्यात आली आहे. राज्य सरकारचे जीएसटीचे उत्पन्न लक्षणीयरीत्या वाढत असून त्याचा उपयोग करून शिक्षण व आरोग्य या दोन्हींवरील खर्च वाढवणे, हा अग्रक्रम असायला हवा. तसे झाल्यास महाराष्ट्राला कोणीही थांबवू शकणार नाही.

# चल हल्ला बोल!
# महाविहार ताब्यात घेवू!!

जगातील बौध्द धम्मीयांचे जागतिक विश्वासस्थळ (मी येथे श्रध्दास्थान हा शब्द इतक्यासाठीच वापरत नाही की श्रध्दाला पुरावा नावाचा प्रकार नसतो पण विश्वासाला पुरावे असतात. एखाद्या व्यक्तीवर विश्वास असेल तर त्या व्यक्तीचा मनोभावे आदर केल जातो. उदा.भ.बुध्द,सम्राट अशोक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर इत्यादी व अशी कित्येक. आजही हयात असणार्या एखाद्या व्यक्तीवर विश्वास ठेवला जातो.कारण ती व्यक्ती विश्वासाला पात्र असते.पण श्रध्देला पुरावे नसतात.आजही नालायक मधला नालायक असलेल्या राजकारणी असो अथवा अन्य कोणी किंवा दगडाची मुर्ती असो त्यांच्यावर श्रध्दा व्यक्त करणारे लोक आहेत. ही श्रध्दा पुढे अंधश्रध्दात परिवर्तीत होते. पण ज्यावेळी एखाद्या व्यक्तीवरचा विश्वास उडतो तेव्हा लोक त्या व्यक्तीपासून दूर होतात.) असलेले मगध राज्यातील सद्या बिहार राज्य (विहार शब्दाचा अपभ्रंश) गया येथील महाबोधी महाविहारात घुसखोरी झालेली आहे. ब्राम्हणी तथा सनातन वैदिक धर्मियांनी महाविहार आपल्या ताब्यात ठेवले आहे. याबाबत खाली पाहूच. दोन हजार वर्षापुर्वी मगध राज्यात सम्राट अशोक राजा यानी बौध्द स्वराज्याची निर्मिती केल्यानंतर सम्राट अशोकांनी बौध्दांच्या स्वराज्याचा झेंडा अटकेपार रोवला.आफगाणिस्तानापर्यंत स्वराज्याचा विस्तार केला. आजही आफगाणिस्तान हे जंक्शन आहे.तेथून चारी दिशेला जाण्यासाठी वाटा मिळतात.कदाचित म्हणूनच धम्म प्रसाराच्या दृष्टीने सम्राट अशोक राजा यानी आफगाणिस्तानला आपली उपराजधानी बनवले असावे.तेथे मोठ्या प्रमाणात विहार बांधली असावीत. आफगाणिस्तानमधील बामियान प्रांतामधील डोंगर उतार्यावरील सुळ्या दगडात कोरलेली १५० फूट बुध्द मुर्ती (चंगेझ खान,औरंगजेब व तालिबान्यांनी मुर्ती तोडली) आजही भग्न अवस्थेत आहे. ह्यू-एन-त्सँग (चीन) हे बुध्दांची, धम्माची व धम्म संस्कृतीची माहिती जाणून घेण्यास इ.स. ६२९ ते ६४५ या दरम्यान भारत भेटीवर आले असता त्यानी १५० फूट मुर्ती पाहिली होती. त्यावेळी मुर्तीला साधा तडा गेला नव्हता. तेथेच त्यानी एका संघारामात एक हजार फूट लांबीची महानिर्वाण मुद्रेतील भ.बुध्दांची मुर्तीसुध्दा पाहिली होती. सांगण्याचे तात्पर्य इतकेच की त्या काळी मगध राज्यापासून ते आफगाणिस्तानापर्यंत बौध्द धम्माचे उपासिका व उपासक वास्तवाला होते.

सम्राट अशोक राजा यानी ८४ हजार बौध्द स्तूप बांधले. त्यातील एक बौध्द स्तूप म्हणजे महाबोधी महाविहार होय. बुध्दांच्या जीवनात जी चार ठिकाणं अविस्मरणीय ठरली ती चार ठिकाणं म्हणजेच १.बुध्दांचे जन्म ठिकाण २.बुध्दांना ज्या ठिकाणी बुध्दत्व प्राप्त झाले. ३.बुध्दांनी ज्या ठिकाणी धम्मचक्र प्रवर्तन केले. म्हणजेच एक प्रकारे बौध्द धम्म स्थापनचे ठिकाण व ४.बुध्दांना महानिर्वाण प्राप्त झाले ते ठिकाण. या चारी अविस्मरणीय ठिकाणांवर सम्राट अशोक राजा यानी बौध्द स्तूप बांधली. त्यापैकीच बुध्दांना ज्या ठिकाणी बुध्दत्व प्राप्त झाले त्या गयातील महाबोधी महाविहार एक होय. सम्राट अशोक राजा हे कोणी ब्राम्हण किंवा ब्राम्हण्यवादी किंवा ब्राम्हणी धर्मातील सदस्य नव्हते. ते बौध्द होते. त्यानी बौध्द धम्माची दीक्षा घेतल्याचे भक्कम पुरावे आहेत. जगाने मान्य केले आहे की, महाबोधी महाविहार हे बौध्दांचे जागतिक वंदनास्थळ आहे. म्हणूनच जगातील बौध्द तथागतांच्या मुर्तीला पंचाग प्रणाम करायला येतात.जगात कुठेही बौध्द जन्माला येवो तो म्हणतो मला एकदा का असेना बुध्दांना ज्या ठिकाणी बुध्दत्व प्राप्त झाले तेथे सम्राट अशोक राजा यानी उभारलेल्या महाबोधी महाविहारात जावून वंदना व महाविहारातील बुध्द मुर्तीसमोर पंचाग प्रणाम करण्यास गेलेच पाहिजे.

महाविहार उभारल्यापासून ते आजवर तेथे जगातील बौध्द हे वंदनासाठी येत आहेत. त्यात खंड नाही. जगात प्रामुख्याने तीनच धर्माचे जागतिक धार्मिक स्थळ आहेत. १.ख्रिश्चन धर्मियांचे व्हॅटकिन सिटी (रोम, इटली) २. मुस्लीमांचे मक्का मदिना (सौदी अरेबिया) व तिसरे बौध्द धम्मीयांचे बुध्दगया (बिहार राज्य, भारत). या तीन धर्मियांचीच लोकसंख्या सर्वाधिक आहे. पृथ्वीच्या चारी बाजूला या तीन धर्माचेच अनुयायी, उपासक दिसतात. इ स.३९९ ते ४१४ या काळात बौध्द धम्माचा अभ्यास करण्यासाठी भारत भेटीवर आलेले फा हियान (चीन) यानी बुध्दगयाला भेट दिली. तेथील काही आठवणी त्यानी आपल्या प्रवास वर्णनात करताना ते लिहितात, 'ज्या ठिकाणी बुध्दांना बुध्दत्व प्राप्त झाले, त्या ठिकाणी तीन संघाराम आहेत. त्या सर्वांत भिक्खू राहतात. त्या भिक्खूंना स्थानिक लोक आश्रय देतात आणि त्याना काहीही उणे पडू नये अशारितीने सढळ हाताने दान करतात. तेथे धम्मातील विनयाच्या नियमाचे कडकरित्या पालन केले जाते आणि बुध्दांच्या काळी जसे आदरणीय भिक्खू शिष्टाचार पाळीत त्याचप्रमाणे बसण्या-उठण्यात आणि सभेत पाळावयाचे शिष्टाचार हे भिक्खू पाळतात.' याच भिक्खूंकडे महाबोधी विहाराच्या देखभालाची जबाबदारी असावी. तसेच तेथील लोक हे भिक्खूना सढळ हाताने मदत करतात याचा अर्थ ते बौध्द अनुयायी असले पाहिजेत. चौथ्या शतकात गया हा परिसर बौध्दमय होता. मग आता तेथे ब्राम्हणी धर्माचे वर्चस्व कसे? महाबोधी महाविहार ब्राम्हणांच्या ताब्यात कसे? हे प्रश्न सहाजिकच पडणार.

सम्राट अशोक राजा यांच्या महानिर्वाणानंतर पुढे त्यांच्या मौर्य घराण्यातील सात राजानी मगधचे सिंहासन सांभाळले. शेवटचा राजा बृहद्रथ मौर्य हे फारच दयाळू, मायाळू व धम्माबाबत संवेधनशील होते. कदाचित त्यामुळे व ब्राम्हणांचा राग हा सम्राट अशोकांवर असावा. दि. ६ जून १९५० रोजी श्रीलंकाची राजधानी कोलंबो येथील कार्यक्रमात बोलताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'सम्राट अशोकाच्या काळात कुलदेवतापूजेची निंदा करण्यात आली. अशोक म्हणतो, मी बौध्द धर्माच्या मार्गाचे अनुकरण करीत असल्यामुळे मला दुसर्या कोणत्याही देवी देवतांची पूजा करण्याची गरज नाही आणि त्याने आपल्या प्रशासनाधिकार्यांना आदेश देवून कुलदेवतांच्या मुर्ती काढून टाकल्या. हा ब्राम्हणांवर फार मोठा प्रहार होता. कारण यामुळे त्यांच्या उपजिविकेला व धूर्त प्रचाराला फार मोठा धक्का बसला आणि ते त्याचा बदला घेण्यास सिध्द झाले.' दिडशे वर्षापुर्वी ब्रिटीशांनी ब्राम्हणी धर्मातील रूढी परंपरा विरोधात कायदे करण्यास सुरूवात केली, प्रबोधनासाठी शैक्षणिक संस्था उघडल्या, प्रसार माध्यमांना चालना दिली तेव्हा ब्राम्हण्यवाद्यांनी राष्ट्र स्वातंत्र्याच्या नावाखाली धर्मावर आलेले ब्रिटीशरूपी संकट दूर करण्यासाठी हाती शस्त्र घेवून मैदानात उतरले. हे अलिकडचे उदाहारण. मौर्यांच्या सैन्य दलात सेनापती असलेल्या पुष्यमित्र शुंगाने राजा बृहद्रथ याना कपटकारस्थान करून ठार मारले आणि सत्ता आपल्या हातात घेतली. हयू-एन-त्सँग हे राजा शशांक याने बोधीवृक्षाचे नुकसान केल्याचे सांगतात.याचा अर्थ ६ व्या शतकात होवून गेलेला राजा शशांक हा ब्राम्हणी धर्माचा समर्थक होता.पण त्याला बौध्द धम्माचा र्हास करता आला नाही. मात्र पुष्यमित्र शुंग त्याचा बाप निघाला.या पृथ्वीतलावर एक बौध्दच काय पण भिक्खूही दिसता कामा नये यासाठी भिक्खूंची मुंडकी तोडून आणणार्यांना घसघशीत रोख इनाम जाहीर केले. त्याने शस्त्राच्या धाकानेच बौध्दांना आपल्या धर्मात ओढले. जे कट्टरवादी होते त्याना ठार मारले, तर काहींना आपल्या धर्मात गुलाम केले.जे आज अस्पृश्य,भटके,आदिवासी,बलुतेदार म्हणून जगत आहेत. ज्यांची वस्ती आजही गावकुसाबाहेर आहे. शुंगाच्या काळातच ब्राम्हणी धर्माचे शंकराचार्य पीठ निर्माण झाले. सम्राट अशोक राजा यानी धम्म प्रसारासाठी चार धम्म पीठांची स्थापना केली,तसे जम्बुद्विप भारतात चार शंकराचार्य पीठ उभारलीत. चार शंकराचार्य पीठानी आपल्या धर्माचे देवालयं उभारणीसाठी बौध्द स्तूपांचा वापर केला.आजही बहुतांशी प्राचीन हिंदू देवालयं आहेत,ती बौध्द विहारं असल्याचे दिसते.त्यातील बुध्द मुर्तींचे स्त्री देविकामध्येही रूपांतरित केल्याचे दिसते. अन्यथा ८४ हजार बौध्द स्तूपांपैकी बहुतांशी स्तूपं कुठे गेली? जमीनीत तर गाडली नाहीत.

आजच्या विषयाकडे जावूया,वरील वाचन केले तर महाबोधी महाविहार हे बौध्द धम्मीयांच्य मालकीचे आहे हे कुणालाही नाकारता येणार नाही.पण शंकराचार्याच्या पीठानंतर महाबोधी विहार विदेशी आर्यांनी म्हणजेच ब्रामहवृंदांनी आपल्या ताब्यात घेतले. महाविहारात जगभरातील बौध्द आदरपुर्ती पूजासाठी येत होते हे आठराशे वर्षापुर्वी ह्यू-एन-त्सँग सांगत असतील तर त्या बौध्द उपासकांकडून महाविहारात मोठ्या प्रमाणात दान केले जात असावे.आजही महाबोधी विहारात देश-विदेशातील बौध्द मोठ्या प्रमाणात दान करतात.बौध्द धम्मात दहा पारमितामध्ये दान पारमिता असल्याने बौध्द अनुयायी दान पारमिताला अन्ययसाधारण महत्व देतात. 'दान जेथे ब्राम्हण तेथे' हे सूत्र आजही हिंदू देवालयामध्ये दिसून येते. पंढरपुरातील विठ्ठल मंदिर असो,आंध्रातील तिरूपती मंदिर असो अथवा ओडिसा राज्याच्या पुरीतील जगन्नाथ मंदिर असो अथवा उत्तराखंडातील केदारनाथ मंदिर असो ही सारी मंदिर बौध्द विहार म्हणून प्रसिध्द होती.तेथे हजारोच्या संख्येने बौध्द वंदनासाठी येत होते.दान करत होते.त्या विहाराचं मंदिरात रूपांतर केल्याचे पुरावे बौध्द असतात.

भारतात ब्रिटीश साम्राज्य होते तेव्हा काही ब्रिटीश



अधिकार्यांनी धम्माच्या संस्कृतीची ओळख असलेल्या अनेक विहार,स्तूप, शिलालेखांची खोज केली.त्यापैकीच एक अजंठा वेरूळची लेणींचा शोध घेतला.ब्रिटीश अधिकारी अलेक्झांडर कलिंघम यानी महाबोधी महाविहार हे बौध्दांचे असल्याचे सांगितले.कलिंघमच्या काळी बिहार राज्यासह बहुतांशी भारत हा बौध्द धम्माच्या दृष्टीने शून्यवत होता.त्यामुळेच महाबोधी विहाराच्या मालकीसाठी संघर्ष करण्यासाठी बौध्द कमी होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी १९५६ ला धम्माची दीक्षा घेण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांच्या बरोबर लाखो बहुजनांनी धम्म दीक्षा घेतली आणि त्यानंतर आजपर्यंत भारतात रोज कुठे ना कुठे धम्म दीक्षा समारंभ होताना दिसतात.भिक्खूंच्या संख्येतही वाढ होताना दिसत आहे.त्यामुळे भिक्खू व बौध्दांना भारतातच नव्हे,तर जम्बुद्विप भारतात धम्माची वारसास्थळं असून ती आपणासकडे यावीत अशी मागणी करत आहेत. त्यापैकीच एक असलेले महाबोधी महाविहार.

स्वतंत्र भारत झाल्यानंतर महाबोधी महाविहार बौध्दांच्या ताब्यात दिले पाहिजे अशी मागणी केली जात आहे.संविधान लिहिले बौध्द महाउपासकाने.पण बौध्दांच्या हाती सत्ता नसल्याने संविधानाची अंमलबजावणी करणारे निघाले कर्मठ सनातनी.बुध्दगया मंदिर कायदा-१९४९ कायदा झाला.त्या कायद्यामध्ये महाबोधी महाविहाराल मंदिर असे संबोधले.तसेच त्या कायद्यानुसार महाबोधी महाविहाराच्या देखभालीसाठी एका समिती असण्याची तरतूद केली.त्या समितीमध्ये एकूण ९ सदस्यांपैकी पाच सदस्य हिंदू व चार बौध्द असतील. म्हणजे सर्वाधिक सदस्य हिंदूच असल्याने तेच संख्येच्या जोरावर निर्णय घेणार.चार बौध्द देखील त्यांचीच आहेत. ते केवळ नावालाच बौध्द आहेत. हे लक्षात घेवून भिक्खू संघाने गेल्या काही दिवसापुर्वी महाविहाराच्या आवारातच महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन सुरू केले.१७ दिवस आंदोलन सुरू राहिल्यानंतर बिहार पोलीसांनी रात्री अपरात्री येवून आंदोलन करणार्या भिक्खूंना जबदरस्तीने उचलून गाडीत घालून अज्ञातस्थळी नेले.बिहार राज्यातील सत्तेत भाजपचीही भागिदारी आहे.सद्या भाजपला या देशाला हिंदु राष्ट्र करायचा आहे.मग बिहारमधील भाजप सत्ताधीश महाबोधी विहार बौध्दांकडे देणे शक्य नाही.कारण ब्राम्हण्यवादी लोक एखाद्याचा धर्म कसा हायजॅक करण्यात, इतर धर्म कसे नालायक आणि आपलाच धर्म कसा लायक हे सांगण्यात पटाईत आहेत.

बौध्द धम्माला संपविण्यासाठी नानाविध षडयंत्र केलीत. पहिल्यांदा त्यानी बौध्द धम्मातील उत्सवावर आघात केला. धम्मातील उत्सव जेव्ह आहेत तेव्हा आपले उत्सव सुरू केले. दोन्ही उत्सवामध्ये १८० अंशाचा फरक राहणार नाही याची काळजी घेतली.त्यानंतर त्यानी बुध्दांना ब्रम्हदेव विष्णूचा नववा अवतार केला.अवतार पॅटर्न हा ब्राम्हण्यवाद्यांचाच. बौध्द स्तूप व विहारांचे मंदिरात रूपांतर केले.बौध्द लेण्याना पांडव लेणी करून टाकले व त्या ठिकणी पिंड बसवून शंकराचं ध्यानस्थ ठिकाण केले. ब्राम्हण्यवाद्यांनी जरा देखील बौध्द धम्माबद्दल सहानुभूती दाखवली नाही. परकीय मुस्लीमांना बुध्द मुर्ती फोडण्यास प्रोत्साहन दिले. सम्राट अशोक काळातही ते कुरघुड्या करत होते. पण सम्राट अशोक राजा यानी त्याना आसरा दिला. त्यांना बरोबरची स्थान दिले. त्याना संरक्षण दिले. हेच अंगलट आले. आजच्या राजकारणातीलही उदाहरण घेतले, तर काँग्रेस पक्षाची एकहाती सत्ता येत होती. तेव्हा काँग्रेस सत्ताधार्यांनी आपल्या धर्माचे म्हणून आरएसएसने स्थापन केलेल्या भाजप,विश्व हिंदू परिषदच्या लोकांना जवळ केले.पण आता भाजपची सत्ता येताच भाजप नेत्यांकडून 'काँग्रेसमुक्त भारत' ची घोषणा केली आहे. काँग्रेससह इतर विरोधी पक्षाच्या नेत्यांविरोधात ईडी,सीबीआय, इन्कम टॅक्स लावून त्याची तोंडे बंद केली जात आहे. विरोधकांची ताकद कमी करायची हाच नियम सर्व क्षेत्रासठी लागू आहे. सम्राट अशोक राजा यानी सम्यक ऐवजी टोकाचा मानवतावाद दाखवला. दि. ६ जून १९५० रोजी श्रीलंकाची राजधानी कोलंबो येथील कार्यक्रमात बोलताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'सम्राट अशोक वाजवीपेक्षा जास्त सहनशील होता. यामुळे मी त्याला दोष देत आहे.सम्राट अशोकांने आपल्या कारकिर्दीत बौध्द धर्माशिवाय अशा अनेक धर्मांना प्रचाराची मुभा देवून ठेवली होती की,जे बौध्द धर्माचे कट्टर दुश्मन होते. यामुळे बौध्द धर्माच्या विरूध्द असणार्या अधर्मांना आपली शक्ती वाढविण्याची पुरेपूर संधी प्राप्त झाली व हाच बौध्द धर्माला पहिला आघात होय असे मला वाटते.' पुंद्रवर्धन या जैन साधकाने महावीर समोर भगवान बुध्द नतमस्तक झालेले चित्र काढले होते ते सम्राट अशोक राजा याना समजल्यावर त्यानी पुंद्रवर्धनला पकडण्याचा हुकूम काढला. इतकेच नव्हे तर त्याच्या पंथातील सुमारे १८ हजार आजीवकांना ठार करण्यचे फर्मान काढले. काही काळाने पाटलीपूत्र येथे आणखीन एका जैन साधकाने असेच चित्र काढल्यानंतर त्या साधकाला व त्याच्या कुटुंबाला जिवंत जाळण्याची आज्ञा केली होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात त्यात तथ्थ असेल, तर हाच कठोरपणा सम्राट अशेक राजा यानी ब्राम्हण्यवाद्याबद्दल ठेवला असता तर आज एससी,एसटी एनटी, व्हीजेएनटी,ओबीसी, एसबीसी या प्रवर्गात जितक्याही जाती आहेत त्या जातीचे लोक बौध्द असते. त्याना सनातनी धर्मात जाण्याचा प्रसंगच उदभवला नसता,त्यांच्या डोक्यात काल्पनिक व अवतारी देव नावाची कल्पनाच मान्य झाली नसती,असे म्हणावे लागेल.सम्राट अशोक राजाशिवाय इतर बौध्द राजा म्हणजेच ६-७ शतकापर्यंत राजा हर्षवर्धन पर्यंत राजांनी देखील विदेशी आर्यांचे लाड केले असावेत तसेच त्यांच्या सनातनी धर्माला आश्रय दिला असावा.त्याशिवाय त्यांचे बळ वाढले नसावे.

गेल्या दहा वर्षापासून देशात पुन्हा ब्राम्हण्यवादाने उचल घेतली आहे. महाबोधी विहार हे बौध्दांचे आहे आणि राहणार आहे.आयोध्यातील राम मंदिराची देखभाल करण्यासाठी जसा हिंदूंना जैन,मुस्लीम,ख्रिश्चन, शीख,बौध्द चालत नाही,तर मग महाबोधी विहारात ब्राम्हण कसे? विहाराच्या आवारात श्राध्दपक्ष, होमहवन विधी का केला जात आहे? याला काँग्रेस पक्षाचे सरकार जबाबदार आहे. सन २०१४ पुर्वीपर्यंत १९९९ व १९७७ चे काँग्रेसत्तर सरकार वगळता स्वतंत्र भारतात काँग्रेस पक्षाचेच सरकार केंद्रात होते. काँग्रेसचे सरकार असतानाही बौध्द भिक्खूंनी महाबोधी विहार बौध्दांच्या ताब्यात देण्याची मागणी केली.पण काँग्रेसमध्येही ब्राम्हण्यवादी होते. आता तर ब्राम्हण्यवाद्यांचीच सत्ता केंद्रात आहे. ते कदापीही महाबोधी विहार बौध्दांच्या ताब्यात देणार नाहीत. त्यासाठी बौध्दांनीच एकजूठ होवून महाबोधी विहारमुक्तीचे आंदोलन हाती घेतले पाहिजे. प्रसंगी सरकारवर 'चल हल्ला बोल' चा नारा दिला पाहिजे. टिळक,गोडसे,आपटे,सावरकर अशी कित्येक नाव सांगता येतात की त्यानी आपल्या देव व धर्मासाठी प्राणाची तमा केली नाही.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यानी बौध्द धम्म का दिला याचा प्रत्येकांनी निट विचार केला पाहिजे.जर बौध्दच असू तर घरात धम्माचेच संस्कार घडवून पाहिजे.सर्व घरांतील धम्म संस्काराची मिळून संस्कृती होते आणि त्या संस्कृतीचा समाज होतो.अर्थात बौध्द समाज. डॉ.बाबासाहेब आंबेडकर याना मारणार्या वस्तीच्या दर्शनी बाजूला बौध्दवाडी,बौध्द समाज डॉ.आंबेडकर नगर भीमनगर,बुध्द नगर,सिध्दार्थनगर,पंचशील नगर वगैरे पाट्या वाचायला मिळतात, पण त्या वस्त्यां खर्याच बौध्द संस्कारमय झाल्या आहेत का? नसतील तर महाबोधी महाविहार ब्राम्हण्यवाद्यांच्या ताब्यातून मुक्त होण्याचेही कोणी स्वप्न पाहू नये.वल्गना करू नये.बौध्द पध्दतीने केवळ लग्न,गृहप्रवेश,मरणोत्तर विधी वगैरे घरातील समारंभ केले आणि इतरवेळी हिंदू धर्मातील सणवार,रूढी, परंपरा जपण्याने म्हणजे कोणी बौध्द होवू शकते का?

*******

देवदास बानकर
९२२५८०६९९०

# कोथरूड येथील वनाझ परिवार विद्या मंदिरात 'होम मिनिस्टर' कार्यक्रम उत्साहात संपन्न

पुणे / प्रतिनीधी :– महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी आठ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून वनाज शाळेमध्ये उत्साहात साजरा करण्यात येतो, ह्या कार्यक्रमांतर्गत शाळेमध्ये महिला पालकांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यामध्ये प्रमुख आकर्षण असणारा होम मिनिस्टर हा देखील कार्यक्रम. यामध्ये' उखाणा स्पर्धा ', जाहिरात पूर्ण करणे, सेल्फी विथ सासुबाई, इत्यादी स्पर्धेचे आयोजन केले होते यामध्ये उखाणास स्पर्धेमध्ये सुरेखा हरेर या महिला पालकास प्रथम पारितोषिक तर सौ पिंपळे यांना द्वितीय क्रमांक तर सौ हळदे तृतीय क्रमांक, तर जाहिरात पूर्ण करणे या स्पर्धेमध्ये सौ दिशा हरणे या महिला पालक विजेत्या ठरल्या. सर्व विजेत्या महिला पालकांना आकर्षक भेटवस्तू देण्यात आल्या. होम मिनिस्टर या खेळाचे सूत्रसंचालन श्री



कोकाटे सर व संगीताताई यांनी केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. सौ शुभांगी चव्हाण मॅडम उपप्रशासकीय अधिकारी पुणे मनपा व सौ वासंती जाधव (मा.नगरसेविका ) ह्या उपस्थित होत्या. सौ शुभांगी चव्हाण मॅडमनी महिला पालकांना मोबाईल अतिवापरापासून आपल्या पाल्यास कसे परावृत करावे करावे व पुणे महानगरपालिका मार्फत चालवत येणाऱ्या विविध योजना संबंधी माहिती दिली. तसेच माजी नगरसेविका सौ वासंती जाधव यांनी कोथरूड विभागात महिलांसाठी कमी कालावधीमध्ये वेगवेगळ्या व्यवसाय पूरक अभ्यासक्रमांची माहिती देऊन महिला पालकांना त्यामध्ये प्रवेश घेण्याचा आवाहन केले. त्यानंतर महिला पालकांनी आपली मनोगते व विविध गुणदर्शन कार्यक्रम सादर केले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून शालेय वाहतूक करणारे व्हॅन वाले काका, विद्यार्थी शिक्षक व कर्मचारी यांनी सर्वांनी मिळून शाळेतील महिला शिक्षकांचा भेटवस्तू व पुष्प देऊन सत्कार केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री राऊत सर, पाहुणे स्वागत व परिचय सौ दिवटे मॅडम तर आभार सौ ज्योतीताई लोखंडे यांनी मानले. या कार्यक्रमास मा. सौ शुभांगी ताई चव्हाण, मा. सौ वासंती ताई जाधव, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अनिताताई दारवटकर, शाळेच्या उपमुख्याध्यापिका नीताताई जाधव, शाळेच्या पर्यवेक्षिका माया झावरे सौ कांचनताई गोपाळे तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद, कर्मचारी व महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या या कार्यक्रमाचे आयोजन संस्कृतिक समिती विभागातील सौ मंदाताई , अश्विनी ताई, सुनीता ताई व मंगलताई यांनी केले होते.

# पुरोगामी महाराष्ट्रात महिला नेतृत्वाचे पर्व आनंददायी : प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे

लातूर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय (वाणिज्य व विज्ञान यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यापीठस्तरीय युवती नेतृत्व विकास कार्यशाळा २०२४– २५ जयक्रांती वरिष्ठ महाविद्यालयात संपन्न होत आहे. युवती शिबिरास विद्यापीठातील विविध महाविद्यालयातून १२० मुलींनी सहभाग नोंदविला.या शिबिराचे उद्घाटन दिनांक १० मार्च २०२५ रोजी संपन्न झाले. उद्घाटन सत्राचे अध्यक्ष संस्थेचे सचिव प्रा. गोविंदरावजी घार, उद्घाटक राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य व विद्यापिठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. महादेव गव्हाणे, प्रमुख पाहुणे डॉ. मल्लिकार्जुन करजगी, संचालक राष्ट्रीय सेवा योजना स्वा.रा.ती. म. विद्यापीठ नांदेड, श्री धर्मराज हल्लाळे दै.लोकमत उपसंपादक लातूर, डॉ.कुसुम मोरे सिनेट सदस्य, स्वा.रा.ती. म. विद्यापीठ, नांदेड, प्रा.राहुल वाघमारे विभागीय समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना लातूर, प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रो. श्रीधर कोल्हे, अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रमोद तांदळे ,रासेयो जिल्हा समन्वयक डॉ. केशव आलगुले,आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त धर्मवीर छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठान ट्रस्ट उदगीरच्या वतीने अभिवादन

उदगीर / प्रतिनिधी छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त धर्मवीर छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठान ट्रस्ट उदगीर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य दिव्य पुतळ्याशेजारी चौकात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले. धर्मवीर छत्रपती संभाजीराजे प्रतिष्ठान ट्रस्ट. उदगीर यावेळी सरपंच तथा सामाजिक कार्यकर्ता सतीश पाटील मानकीकर, सामाजिक कार्यकर्ते बी.जी.शिंदे, शुभम गायकवाड, शुभम बिरादार, अमित पले, गणेश जाधव–पाटील, पवन घोगरे, विठ्ठल घोगरे, शिवम बावगे, श्रेयस सूर्यवंशी, अजय शिंदे, व्यंकटेश शिंदे, मयुरी शिंदे यांनीही धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.



# सिबीडी बेलापूर येथील असंख्य कार्यकर्त्यांचा रिपब्लिकन सेनेत जाहीर पक्ष प्रवेश

नवी मुंबई / के. एच. हनवते :– तरुणांचे प्रेरणास्थान, बहुजन हृदय सम्राट, रिपब्लिकन सेना – सरसेनानी मा. आनंदराज आंबेडकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत, नवी मुंबई शहर अध्यक्ष मा. वीरेंद्रजी लगाडे यांच्या प्रयत्नाने दिनांक – १० मार्च २०२५ रोजी सिबीडी बेलापूर विधानसभेतील असंख्य कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन सेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला. व बेलापूर विधानसभेची जिम्मेदारी प्रामुख्याने रोहित राजगुरू यांना देण्यात आली. याप्रसंगी महाराष्ट्र सचिव विनोद काळे सर, मुंबई प्रदेश अध्यक्ष मा. प्रकाश (भाऊ) खंडागळे, रिपब्लिकन युवा सेना मुंबई अध्यक्ष : बाबासाहेब गायकवाड, मा. राजेश शिंगारे सर मुंबई उपाध्यक्ष, पंचायत समितीचे तांबे, भगवान साळवी दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्ष, विष्णू वासवानी नवी मुंबई जिल्हा सचिव, आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



# जैन कलार समाजाच्या वतीने जागतिक महिला दिन थाटात संपन्न.

नागपूर :– दि. ८ मार्च शनिवारला जैन कलार सांस्कृतिक भवन, रेशिमबाग, नागपूर येथील लॉनमध्ये जैन कलार समाज मध्यवर्ती मंडळ व जिल्हा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक महिला दिवस कार्यक्रमाला संपूर्ण विदर्भातून महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या व भरघोस प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने झाली यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पोलिस गुन्हे शाखा निरीक्षक मा. कविता इसारकर, स्त्रीरोग तज्ज्ञ मा. पवन गुल्हाने, वनाधिकारी सौ सारिका वैरागडे,जैन कलार समाज मध्यवर्ती मंडळ केंद्रीय समिती अध्यक्ष श्री चंद्रशेखरजी आदमाने, माजी अध्यक्ष श्री रवींद्र दूरगकर ,शशिकांतजी समर्थ,विलास हरडे, आनंदरावजी ठवरे, अजयजी लाड,गणेशजी दूरगकर, राजेश पलांदुरकर, राजेंद्रजी बन्सोड यांनी केले व सर्व पदाधिकारी यांनी सहभाग घेतला. स्वागत गीत वनिता डेंगे, सुषमा दुरुगकर, सुषमा तिडके, वनिता सोनवणे,अर्चना रणदिवे यांनी सादर केलं तर गणेश वंदना नृत्य आद्या रणदिवे यांनी सादर केलं.या कार्यक्रमात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते यात प्रामुख्याने खेळ स्पर्धा, एकल जुगल /नृत्य, समुह नृत्य, ऐतिहासिक व्यक्तित्व वेशभूषा स्पर्धा, आनंद मेळावा विविध स्पर्धा योजित करण्यात आल्या. यात विदर्भातील विविध भागातील जैन कलार समाज महिलांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला, भरपूर उपस्थितीत कार्यक्रमाचा आनंद लुटला. समूह नृत्यात चंद्रपूर महिला मंडळ यांनी प्रथम क्रमांक तर जय कलारमहिला क्रांती समिती यांनी द्वितीय क्रमांक पटकावला, उत्तर नागपूर, भंडारा, कान्होलीबारा,महिला मंडळ सहभागी होते तर बुटीबोरी, गोधनी, लाखनी, ब्रम्हपुरी, वणी,यवतमाळ, गोंदिया, वडसा, रामटेक,ब्रम्हपुरी उमरेड महिला मंडळांनी उपस्थिती दिली. कार्यक्रमात समाजातील उल्लेखनीय प्राविण्य प्राप्त कामगिरी केलेल्या महिलांचा सन्मानचिन्ह बहाल करून सत्कार करण्यात आला,श्रीमती सुशिला म. वैरागडे, सौ. योगिनी खानोरकर, सौ. क्षिप्रा दीक्षित, सौ. वैशाली दि. समर्थ, सौ. भाग्यश्री अजय समर्थ,श्रीमती शालिनी प्र. मोरघडे,या कार्यक्रमाला जैन कलार समाज मध्यवर्ती मंडळ सहकार्य सोबत डॉ विजय



आदमने व श्री राजेश पालंदुरकर यांचे अर्थिक सहकार्य लाभले. कार्यक्रम उत्तम व्हावा म्हणून सुबोथ पेशने, गणेशजी दुरुगकर, परागजी डांगे, अशोकजी रहाटे सर्व पदाधिकारी यांनी महिला आयोजन समितीला उत्तमसाथ दिली. महिला आयोजन समिती सौ योगिनी सोनावणे, सौ कल्पना रहाटे,सौ अक्षदा खेडीकर, श्रीमती रजनीताई चिमूरकर,सौ पल्लवी खापरीकर ,सौ अनिता आदमाने, सौ अर्चना रणदिवे सौ संगीता दहीकर,सौ मनिषा मानापुरे, डॉ सौ प्रतिभा डोर्लीकर,सौ कल्पना रणदिवे, सौ कल्पना शीरपुरकर सौ मंजिरी मासुरकर, सौ पूर्णिमा तिडके,सौ भारती भांडारकर, सौ आशाताई खानोरकर ,सौ रेखा बन्सोड यांनी जबाबदारी उत्तम रित्या पार पाडली.कार्यक्रमाच सूत्र संचालन सौ अंकिता हरडे व तृप्ती वारर्जूरकर यांनी केले.या कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ सौ छायाताई आनंद दूरगकर, (केंद्रिय संचालिका) सौ माधुरी घोषेकर,, (केंद्रिय संचालिका) सौ संगीता अतकर, सौ श्वेता अतकर सौ वीणा खानोरकर,(जिल्हा संचालिका) सौ सुरेखा अहिरेकर (जिल्हा समिती उपाध्यक्ष) इत्यादीसह समाजबांधव व भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

# लातूर स्त्री रोग संघटना व बरमदे हॉस्पिटलमध्ये आयोजित ' सुरक्षित मातृत्व ' एकदिवसीय कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर : लातूर स्त्री रोग संघटना आणि बरमदे हॉस्पिटल औसा रोड लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने लातूरच्या बरमदे हॉस्पिटलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ' सुरक्षित मातृत्व' या विषयावरील एक दिवसीय कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेत लातूरसह जिल्ह्यातील निलंगा, चाकूर, शिरूर अनंतपाळ तालुक्यातील एकूण ९५ डॉक्टरांनी आपला सहभाग नोंदविला. सेफ मदरहूड अर्थात ' सुरक्षित मातृत्व ' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. अजय जाधव, डॉ. अनिशा गाला ,डॉ .आरती सिंग, डॉ. अमित उटीकर , डॉ. गिया जी. आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यशाळेत त्यांनी गर्भार अवस्थेतील स्त्रियांची काळजी कशी घ्यावी, गर्भवती स्त्रियांचा आहार काय असावा, गरोदर मातेची सोनोग्राफी कधी करावी, बाळामध्ये कोणकोणते व्यंग येऊ शकते, याविषयी उपयुक्त असे मार्गदर्शन केले. विज्ञानाने केलेल्या प्रगतीच्या जोरावर आज वैद्यकीय क्षेत्रही प्रगल्भ झाले आहे. बाळाच्या जन्माच्या आधीच त्याची मातेच्या गर्भातील वाढीसह अनेक बाबींवर लक्ष ठेवणे शक्य झाले आहे. त्यामुळे ' सुरक्षित मातृत्व' ही संकल्पना आजमितीस प्रत्येक गर्भवती महिलेसाठी आणि तिच्या बाळासाठी खरोखर अतिशय महत्वपूर्ण ठरताना दिसते.



ही एकदिवसीय कार्यशाळा डॉ. मनीषा व. डॉ कल्याण बरमदे यांच्या मार्गदर्शनाखाली बरमदे हॉस्पिटलच्या सीएमई हॉलमध्ये उत्साहात पार पडली. या कार्यशाळेत डॉ. भालचंद्र, डॉ. दरडे, डॉ. मंदाडे, डॉ. तापडिया, डॉ. दाताळ , डॉ. स्वाती गोरे, डॉ. मुशीर शेख, डॉ. अनिता रेड्डी, डॉ. प्रेरणा राजे देशमुख, डॉ. प्रणिता नागुरे ,लातूर स्त्री रोग संघटनेच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा पाटील, सचिव डॉ. मनिषा बरमदे यांच्यासह जिल्हाभरातील ९५ तज्ज्ञ डॉक्टर्स सहभागी झाले होते.

# विधानसभा निवडणुकीतील पराभवाची जबाबदारी स्वीकारून काँग्रेस जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा : श्रीशैल्य उटगे

लातूर : नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत लातूर जिल्ह्यातील सहा पैकी तीन जागा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने लढविल्या. त्यापैकी केवळ एका जागेवर काँग्रेसला विजय मिळाला. उर्वरित दोन जागांवर पक्षाला पराभवाचा सामना करावा लागला. या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपण आपल्या जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांकडे सुपूर्द केल्याची माहिती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांनी मंगळवारी लातुरात पत्रकारांशी बोलताना दिली. लातूर शहरातील काँग्रेस भवन मध्ये काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे यांनी पत्रकारांशी सुसंवाद साधला. आपल्या साडेचार वर्षांच्या जिल्हाध्यक्षपदाच्या कार्यकाळात केलेल्या कार्याचा संक्षिप्त अहवाल त्यांनी यावेळी सादर केला. काँग्रेसच्या लातूर जिल्हाध्यक्षपदाचा पदभार आपण दि. २४ जून २०२० रोजी स्वीकारल्याचे सांगून उटगे पुढे म्हणाले की, जिल्हा काँग्रेसमधील नेत्यांची वयोमर्यादा ६५ वर्षावरुन आपण ३५ ते ५० या वर्ष वयोगटात आणली. राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेमध्ये लातूर जिल्ह्यातून तीस हजारांहून अधिक काँग्रेस पदाधिकारी घेऊन सक्रिय सहभाग नोंदविला . कोरोना काळात लातूर जिल्ह्यातील सर्व पोलीस प्रशासन, ४८ आरोग्य केंद्र , महानगरपालिका, नगर परिषदमधील सर्व स्वच्छता कर्मचारी , जिल्ह्यातील सर्व महसूल विभागातील कर्मचाऱ्यांना पीपीटी किट, मास्क, सॅनिटायझर, ऑक्सिमीटरचे वाटप केले. कोरोना काळात गरजू लोकांसाठी २१ हजार अन्नधान्य किट वाटप करण्यासाठी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले. जिल्हा काँग्रेसच्या वतीने कोविड टास्क फोर्सची स्थापना करून हजारो रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात आली. शेतकरी विरोधी कायदे रद्द करण्यासाठी जिल्हा काँग्रेसच्या वतीने भव्य ट्रॅक्टर रॅलीचे यशस्वी आयोजन केले. त्यासाठी शेतकऱ्यांच्या स्वाक्षरीची मोहीम राबवून एक लाखहुन अधिक शेतकऱ्यांच्या स्वाक्षरीचा अहवाल प्रदेश कमिटीकडे सादर केला. आजादी गौरव यात्रेचे आयोजन करून लातूर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार क्षेत्रात एकूण १०६ किलोमीटर पदयात्रा केली. आ. अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करून तब्बल २ हजार ५५३ रक्त बॅगांचे संकलन केले. जिल्हा काँग्रेसच्या वतीने मोफत नेत्रतपासणी शिबिरामध्ये ८ हजार ५०० ते ९ हजार रुग्णांची तपासणी करून त्यापैकी ९५६ नेत्र रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया व चष्म्याचे वाटप करण्यात आले. इंधन दरवाढी विरोधात सायकल रॅली काढून निषेध व्यक्त केला. सभासद नोंदणीमध्ये लातूर जिल्ह्यातून २ लाख १ हजार २९० डिजिटल सभासद नोंदणी करून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. हात से हात जोडो अभियान, मराठवाडा विभागीय बैठक, जेल भरो आंदोलन, चिखल फेको आंदोलन, राज्यातील काँग्रेसच्या खासदारांच्या सत्काराचे आयोजन, राज्यात सर्वाधिक २९ सेल कार्यान्वित असणारा एकमेव जिल्हा अशी लातूरची ओळख निर्माण करण्यास अनेक समाजोपयोगी कामे आपल्या कार्यकाळात पार पाडल्याचे उटगे यांनी स्पष्ट केले. लोकसभा निवडणुकीत लातूर लोकसभा मतदार संघातून काँग्रेसचे डॉ. शिवाजी काळगे विक्रमी मतांनी निवडून आले. पण, विधानसभा




निवडणुकीत काँग्रेसला जिल्ह्यात तीन पैकी एकाच जागेवर निवडणूक जिंकता आली. उर्वरित दोन विधानसभा मतदार संघात पक्षाला प्रभाव स्वीकारावा लागला. त्या पराभवाची नैतिक जबाबदारी ग्रामीणचा जिल्हाध्यक्ष या नात्याने आपली असल्याचे मान्य करून आपण आपल्या पदाचा राजीनामा पक्षाच्या प्रांताध्यक्षांकडे सुपूर्द केल्याचे श्रीशैल्य उटगे यांनी सांगितले. आपल्या राजीनाम्याबाबत आपण जिल्ह्यातील काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांशीही चर्चा केल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात पक्ष सोपवले ती जबाबदारी आपण सक्षमपणे पार पाडण्यास तयार आहोत. जिल्हाध्यक्षपदाच्या काळात सहकार्य करणाऱ्या सर्व पदाधिकारी, नेते, मान्यवरांचे आपण आभार मानतो,असेही श्रीशैल्य उटगे यांनी बोलून दाखविले. यावेळी अनुसूचित विभागाचे जिल्हाध्यक्ष एड.बाबासाहेब गायकवाड, लातूर तालुका अध्यक्ष सुभाष घोडके, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष सिराजोद्दिन जहागीरदार, सेवादलाचे जिल्हाध्यक्ष अनिल चव्हाण,ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रा. एकनाथ पाटील, डॉक्टर विभागाचे जिल्हाध्यक्ष डॉ.अरविंद भातांब्रे, सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी,लातूर काँग्रेस कमिटीचे समन्वयक प्रा. ओमप्रकाश झुरळे ,ग्राहक संरक्षण विभागाचे जिल्हाध्यक्ष सोनू डगवाले, व्हीजीएनटी विभागाचे जिल्हाध्यक्ष सुरेश चव्हाण, क्रीडा विभागाचे जिल्हाध्यक्ष बालाजी साळुंखे,एनएसयुआय विभागाचे जिल्हाध्यक्ष रामराजे काळे, औसा पंचायत समितीचे माजी सदस्य प्रकाश मिरगे, संजय लोंढे , धैर्यशील भोसले, विक्रम गरड, मुकेश बिदादा आदी उपस्थित होते.

# किनवट शहरातून जाणाऱ्या रस्त्याच्या काम होतील कधी? सहा वर्षांनंतरही महामार्गाचे काम हळू हळू गतीने

किनवट: शेख शौकत :–किनवट शहरातील साई वंदना मंगल कार्यालयासमोर रस्त्याची दयनीय अवस्था झाली असून अनेक दुचाकी वाहनाच्या रस्त्यावर अपघात वाढले आहेत. जड वाहनांना या मार्गाने वाहने चालवणे कठीण झाले आहे. या सर्व बाबी लक्षात घेता किनवट करांच्या विकास कामासाठी कोणीतरी लक्ष देणार वाली आहे काय असा गंभीर प्रश्न किनवटकर करीत आहेत. राष्ट्रीय महामार्ग १६१भोकर फाटा ते धनोडा फाटापर्यंत राष्ट्रीय महामार्ग कामास सुरुवात होऊन ६ वर्ष लोटल्यानंतर डॉ. आंबेडकर चौक ते बुलढाणा अर्बनपर्यंत राष्ट्रीय महामार्गाचे काम रखडलेलेच आहे. प्रदीर्घ संघर्ष व मागणीनंतर गुत्तेदाराला जाग अली परंतु हे कामही थातूरमातूर होत असल्याने अनेक दुचाकीचे अपघात वाढले आहेत. जड वाहने या रस्त्याने चालवणे कठीण होत आहे. तात्काळ या रस्त्याची दुरुस्ती करा अन्यथा जलआंदोलन छेडू असा इशारा नागरिकांनी दिला आहे. गत ६ वर्षापासून राष्ट्रीय महामार्गाची सुरुवात होऊन १०० टक्के कामाची कशी का होईना पूर्तता झाल्याचे




दिसते परंतु या रस्त्याच्या मधोमध असलेला किनवट शहरातून जाणाऱ्या रस्त्याच्या कामाला काही मुहुर्त लागला नाही. अनेक वर्षापासून खड्डे व धुळीपासून नागरिक व व्यापाऱ्यांना तर सोडाच याच रस्त्याला लगत असलेल्या प्रशासकीय कार्यालय, न्यायालय, तहसील कार्यालय, न्यायाधीश निवासस्थान, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, शहर हाताळणारी सर्वात महत्त्वाची नगरपालिका प्रशासन कार्यालयांतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनाही प्रचंड त्रास होवूनही कुणी या कामांचे गांभीर्य ओळखले नाही. परिणामी पत्रकारांनी या रस्त्याच्या कामासाठी आंदोलनही केले. संबंधित गुत्तेदार व अधिकाऱ्यांना जाग आली व दिवाळीनंतर या कामास अखेर मुहुर्त लागला परंतु खोदकाम करून यामधील मटेरियल संबंधित गुत्तेदारानेच पैनगंगा नदीवरील बंधाऱ्याचे काम घेतल्याने तेथील कामाकडे लक्ष देत या रस्त्यावर केवळ मुरुम टाकले जात आहे. संबंधित गुत्तेदाराने डॉ. आंबेडकर चौक ते बुलढाणा अर्बन शाखेपर्यंत खोदकाम करून मनमर्जी प्रमाणे मुरुम भरल्याने शहरातील नालीचे संपूर्ण सांडपाणी साई वंदना मंगल कार्यालय समोरील खोदलेल्या राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर जमा होऊन या पाणी, मातीमुळे अनेक दुचाकी वाहनधारक अपघातग्रस्त होत आहेत. संबंधित राष्ट्रीय महामार्ग वाल्यांनी हा रस्ता तात्काळ बनवण्यास सुरुवात करावा अन्यथा लोकशाही मार्गाने आम्ही आंदोलन छेडू व संबंधिताला धडा शिकवू, असा इशारा देण्यात आला आहे.

# इस्लाम धर्माचा पवित्र रमजान महिन्यात १०वर्षीय अरफात मलीक चव्हाण ने ठेवला आयुष्यातील पहिला रोजा

किनवट: शेख शौकत :–इस्लाम धर्मात पवित्र रमजान या महिन्याला अनन्य महत्व प्राप्त आहेया महिन्यात सर्वच मुस्लिम बांधव यांच्यावर वयाच्या दहाव्या वर्षा पासून रोजा (उपवास) फर्ज (सक्तीचें) असतात. लहानपासून मोठ्यापर्यत या महिन्यांमध्ये ३० दिवस रोजा धरत असतात. पालकांचे पाहून लहान मुलांनाही रोजा धरण्याची लालसा निर्माण होते. त्यामुळे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा (उपवास) धरतात. अशाच प्रकारे किनवट येथील मलीक चव्हाण यांचा १० वर्षाचा मुलगा अरफात चव्हाण यांनी आपल्या जीवनातील पहिला रोजा



सोमवारी १०मार्च रोजी पूर्ण केला.मुस्लिम समाजात पवित्र असणाऱ्या या महिन्यात संपूर्ण महिनाभर दिवसभर पाणी न पिता उपवास ठेवला जातो.यावर्षी रोजा (उपवास) सकाळी ५.१० वाजता सुरू होत असून संध्याकाळी ६.२८ला रोजा सोडण्याची वेळ आहे.१३ तासा पेक्षा जास्त वेळचा उपवास असल्याने या उष्णतेचा मोठ्या माणसांनादेखील खूप त्रास होतो. त्यात या चिमुकल्याने पहिला रौजा ठेवून आपल्या आयुष्याची सुरुवात एक चांगल्या प्रकारे व्हावी या हेतूने उपवास ठैवला. त्यामुळे अरफात मलिक चव्हाण यांचे सर्व्र कौतुक होत आहे.

# रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे शिक्षणाधिकारी मापारी यांचे आवाहन

लातूर : रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. आपल्या रक्तदानामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो. विद्यार्थी व शिक्षकांनी रक्तदान करून रक्तदान चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांनी केले. येथील राजमाता जिजामाता बी.एड. कॉलेजचे आंतरवासिता शिबिर सुरू असून या शिबिरांतर्गत मंगळवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटक म्हणून शिक्षणाधिकारी मापारी बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी उपशिक्षणाधिकारी संजय क्षीरसागर, संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये, प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, उपप्राचार्या कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, अश्विनी केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्रा. डॉ. एन. के. सय्यद, प्रा. एच. बी. पडवळ, प्रा. ए. यू. करदुरे, राजीव मुंढे, विष्णू कराड, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या शिबिराची सुरूवात झाली. राजमाता जिजामाता बी. एड. कॉलेजचा हा रक्तदान शिबिराचा उपक्रम स्तुत्य असल्याचे यावेळी शिक्षणाधिकारी मापारी म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य केंद्रे म्हणाले, सध्या रक्ताचा तुटवडा असल्याने रक्तदान शिबिरांना




प्रोत्साहन देण्याची गरज आहे. रक्तदान शिबिरे ही काळाची गरज बनली असून यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी श्रीकांत पांचाळ, रोहित डोंगरे, राधा जगताप, गिरीधर वाघमारे, राजीव मुंढे, पांडुरंग सुडे, विजयकुमार पवार, रविकुमार सोनवणे, अमरेश्वर शिवणे, गणेश कांबळे, सतीश जाधव, ऋषिकेश लंकाळे, मारोती गित्ते, पवन नवगिरे, विठ्ठल पेठे आदी विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. सूत्रसंचालन सुमित जोशी यांनी केले तर आभार प्रियंका वाघमारे यांनी मानले.

# जिजाऊ ब्रिगेड च्या वतीने परिचारिका जयश्री हेंडगे यांचा महिला दिनानिमित्त सन्मान

लातूर :– दि. ०९ मार्च रोजी लातूर येथे जिजाऊ ब्रिगेड लातूर पूर्व यांच्या वतीने एक दिवसीय अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनात जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून लातूर शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. त्यात जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयात, सार्वजनिक आरोग्य परिचारिका पदावर कार्यरत महिला कर्मचारी श्रीमती जयश्री हेंडगे– सागावे यांचा आरोग्य क्षेत्रात त्या करीत असलेल्या कार्याबद्दल – मराठा सेवा संघ प्रणीत जिजाऊ ब्रिगेड च्या वतीने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सन्मानचिन्ह व शिवाभिनंदन व शिवशुभेच्छा देणारे सन्मानपत्र प्रदान करून यथोचित गौरव करण्यात आला.

श्रीमती जयश्री हेंडगे या महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या सार्वजनिक आरोग्य विभाग कार्यकारिणीच्या राज्यसहसचि व व लातूर शाखेच्या सचिव पदावर ही कार्यरत आहेत. त्यांच्या यामागील १८ वर्षाच्या खडतर, आव्हानात्मक, संघर्षमय प्रवासात त्यांचे वडील, पती,कुटुंबीय व सहकारी यांचा मोलाचा सहभाग आहे.

जिजाऊ ब्रिगेडचे एक दिवसीय अधिवेशन लातूर शहरातील भक्ति




शक्ति मंगल कार्यालयात पार पडले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती अर्चनाताई पाटील तळेगावकर या होत्या. तर प्रमुख पाहुण्या बबिता वाकडकर– पोलिस निरीक्षक चाकूर या होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिजाऊ ब्रिगेड च्या पदाधिकारी व सभासद यांनी प्रयत्न केला.

# विद्याताई तारळकर यांना कर्तुत्ववान महिला पुरस्कार जाहीर

केज/प्रतिनिधी विद्याताई तारळकर यांना कर्तुत्ववान महिला पुरस्कार नुकताच जाहीर झाला असून दिनांक १६ मार्च २०२५ रोजी निधी मंगल कार्यालय, दारव्हा, जि. यवतमाळ येथे धर्मगुरू जगद्गुरु श्री दयानंद पुरी स्वामी महाराज यांच्या हस्ते पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. विद्याताई तारळकर



जाहीर करण्यात आला आहे. विद्याताई तारळकर यांची कर्तृत्ववान महिला पुरस्कारासाठी निवडीचे अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेचे प्रदेशाध्यक्ष सतीश दाभाडे यांच्या स्वाक्षरीचे पत्र दिनांक ८ मार्च २०२५ रोजी विद्याताई तारळकर यांना देण्यात आले. दिनांक १६ मार्च २०२५ रोजी निधी मंजूर मंगल

रा. नांदुरघाट ता. केज येथील त्या रहिवासी आहेत. विद्याताई तारळकर या गेल्या अनेक वर्षापासून शासकीय सेवेमध्ये कार्यरत आहेत. शासकीय सेवेसह सामाजिक,धार्मिक क्षेत्रासह विविध क्षेत्रांमध्ये नावीन्यपूर्ण काम करत आहेत. त्यांच्या कर्तुत्वाची दखल घेत अखिल महाराष्ट्र कोष्टी समाज परिषदेच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत विद्याताई तारळकर यांना कर्तुत्ववान महिला पुरस्कार कार्यालय,दारव्हा जि. यवतमाळ येथे धर्मगुरू जगद्गुरु श्री दयानंद पुरी स्वामी महाराज कर्नाटक यांच्या शुभहस्ते व समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री अरुणराव वरुडे पुणे आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्याताई तारळकर यांना कर्तुत्ववान महिला पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. विद्याताई तारळकर यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत जागतिक महिला दिन साजरा.

केज/प्रतिनिधी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज या शाळेत जागतिक महिला दिनानिमित्त राजमाता जिजाऊ माँसाहेब, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले,त्यागमुर्ती रमामाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे प्रातिनिधिक स्वरूपात तंटामुक्ती अध्यक्षा शेषाबाई अर्जुन बांगर, अंगणवाडी ताई गवळण सरवदे, मुख्याध्यापक राजाभाऊ दत्तात्रय कदम,शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा सीमा सुधीर मोहिते यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन केले.या वेळी प्रत्येक पुरुषांबरोबर खांद्याला खांदा लावून स्त्रिया काम करतात,थोर पुरुषाला स्त्रीयांनी प्रोत्साहन देण्याचे काम केले म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण केले, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी बहुजनांच्यासाठी कार्य केले, महात्मा फुलेंनी बहुजनांच्या उन्नतीसाठी कार्य केले,अशा अनेक थोर पुरुषाला कामात महिलांनी साथ दिल्याने ते समाजोपयोगी कामे केली. असे या शाळेतील आदर्श शिक्षिका श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम यांनी सांगितले.यावेळी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज शाळेचे मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम,श्री.बाळासाहेब भिल्लु राठोड, श्रीमती सोनाली



भारतराव भुमकर मॅडम,युवा प्रशिक्षणार्थी म्हणून सीमा सुधीर मोहिते,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे, तरनळी ग्रामपंचायतचे सरपंच श्री महादेव खेडकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रत्येक उपस्थित महिलांना पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.संगीत खुर्ची,गीत गायन, उखाणे ,बेटी बचाव बेटी पढाओ असे विविध उपक्रम घेण्यात आले.बालविवाहप्रतिबंध शपथ घेऊन बालविवाह करू नये असे उद्बोधन करण्यात आले.स्पर्धा घेऊन विजेत्या महिलांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.अल्पोपहार व चहापाणी करून शेवटी या शाळेतील शिक्षिका श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम यांनी आभार मानले.या कार्यक्रमात विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करुन सहभाग घेतला.या कार्यक्रमास सरपंच महादेव खेडकर, उपसरपंच,सदस्य,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे, उपाध्यक्षा सौ सीमा सुधीर मोहिते,सदस्य, तंटामुक्ती अध्यक्षा शेषाबाई अर्जुन बांगर, अंगणवाडी ताई गवळण मुरलीधर सरवदे, कोमल दत्ता माने, आरोग्य आशा वर्कर शोभा शिवप्रसाद माने,राधा आक्का खामकर,पीएम पोषण शक्ती निर्माण स्वयंपाकी संगिता गणेश माने, गणेश काशिनाथ माने व बहुसंख्य महिला उपस्थित होत्या.या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन या शाळेतील आदर्श शिक्षिका श्रीमती गिताताई जीवराज अंडील मॅडम, युवा प्रशिक्षणार्थी सीमा सुधीर मोहिते व विद्यार्थिंनी श्रध्दा संपत्ती सरवदे, प्रियंका अशोक देटे,मयुरी मेघराज मोहिते,अंकिता विनोद मोहिते, भाग्यश्री ओमप्रकाश मोहिते, श्वेता सुहास सरवदे, ज्योती श्रीराम खामकर यांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम आयोजित केला.

# ग्री स्टॅकचे काम केज तालुक्यातील सीएससी धारकांना १० मार्च पर्यंत पुर्ण करन्याच्या सुचना

केज/प्रतिनिधी ग्री स्टॅकचे काम केज तालुक्यातील सीएससी धारकांना १० मार्च पर्यंत पुर्ण करन्याच्या सुचना दिल्या आहेत. केज तहसीलचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी तालुक्यातील सीएससी सेंटरला भेटी देऊन कामांचा आढावा घेतला.

उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांच्या आदेशानुसार सर्व सेतू चालकांनी आप आपल्या गावातील



शेतकरी यांचे ऍग्री स्टॅकचे काम दिनांक १० मार्च २०२५ पर्यंत पूर्ण करून घ्यावी. त्यानंतरच आपले सर्व प्रकारचे दाखले लर्शीींळषळलरींश निर्गमित केले जातील. ज्या सेतू चालकांनी काम पूर्ण केले नाही त्यांचा आयडी बंद केला जाईल. असे सक्त. आदेश उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांनी दिले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून केजचे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी केज तालुक्यातील अनेक ठिकाणी सीएससी सेंटर,सेतू चालकांना भेटी देऊन कामे प्रगतीपथावर करावेत अशा सूचना दिल्या तसेच सज्जातील तलाठी यांनाही प्रत्येक गावात दवंडी देऊन व्हाट्सअप ग्रुपच्या माध्यमातून सर्व लोकांपर्यंत हा मेसेज पोहोचण्याचे काम केले आहे . केज तालुक्यातील येवता येथे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी भेट दिली असता अनेक शेतकऱ्यांचे काम प्रगतीपथावर चालू आहे परंतु जिओ कंपनीचे नेटवर्क नसल्याकारणाने कामकाज दुपारी २ वाजल्या पासून संध्याकाळी ७ वाजेपर्यंत बंद राहीले.

सदर जिओ कंपनीचे टॉवर गावात असून नेटवर्क सारखेच चालू बंद होते यामुळे जिओ कंपनीला तक्रारी देऊनही नेटवर्कचा प्रॉब्लेम सॉल होत नाही. सध्या ग्रीस्टॅगचे काम करण्यासाठी सर्व सेतूधारक आपल्या गावातील ऑफिसमध्ये बसलेले असतात परंतु कधी साईटचा प्रॉब्लेम तर कधी नेटवर्कचा प्रॉब्लेम या अशा प्रॉब्लेमला वैतागून सदरील सीएससी धारक यांना काम करण्यासाठी उत्साह राहात नाही तरी सर्व सीएससी धारक आपल्या ऑफिसच्या ठिकाणी काम करण्यासाठी सज्ञ असतात व बहुतेक ठिकाणचे काम पूर्णत्वाकडे जात असल्याचे दिसून येत आहे. तरी जे शेतकरी अजूनही या योजनेपासून वंचित आहेत त्यांनी तात्काळ आपले कार्ड बनवून घ्यावे अन्यथा आपल्या सर्व शासकीय योजना बंद केल्या जाणार आहेत अशा सूचना उपजिल्हाधिकारी यांनी दिल्या आहेत.

# महिला तपासणी शिबिराचे उद्घाटन उत्साहात

लातूर :– येथील लातूर पॅथॉलॉजी मायक्रोबायोलॉजी असोसिएशन, रोटरी मिड टाउन लातूर आणि सिट्रस डायग्नोस्टिक सेंटरचे संचालक डॉ मंगेश कुलकर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने महिला तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. पॅथॉलॉजी मायक्रोबायोलॉजी संघटनेचे संस्थापक कार्यकारी अध्यक्ष डॉ सचिन इंगळे, सचिव डॉ अभिजीत आचार्य, वरिष्ठ पॅथॉलॉजिस्ट डॉ राम कुलकर्णी, रोटरी मिड टाउन चे अध्यक्ष रो. चेतन पंढरीकर, रो. गिरीश पेनसलवार, रोटरी मिड टाउन चे डायरेक्टर डॉ. अभिजीत मुगळीकर,महिला पॅथॉलॉजिस्ट डॉ नीली अंगोम–कुलकर्णी, शिबिराचे मुख्य संयोजक संघटनेचे सहसचिव डॉ मंगेश कुलकर्णी यांच्या हास्ते शिबिराचे उद्घाटन, दीप प्रज्वलन करून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी तिन्ही संस्थेच्या माध्यमातून महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हाभरातील महिलांसाठी पुढील एक महिनाभर सवलतीच्या दरात तपासणीचे उद्दिष्ट सामाजिक बांधिलकीतून या तिन्ही संस्थांनी ठरवले आहे.




या प्रसंगी लातूर यांची उपस्थिती होती. महिला दिनानिमित्त महिला प्रयोगशाळा तंत्रज्ञांचा प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्हे देऊन गौरव करण्यात आला. संघटनांच्या या सामाजिक उपक्रमाचे व बांधिलकीचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. शिबिराचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घेण्याचे आवाहन संयोजकांनी केले आ

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE